PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Pasant Aahe Mulagi
Year:

Song: Ya Nachuya Gauya
Lyricist:

या नाचूया गाऊया
बंधन सारें तोडूया
या हर्षाच्या जोशाच्या
रंगामध्ये न्हाऊया
या नाचूया गाऊया
बंधन सारें तोडूया
या हर्षाच्या जोशाच्या
रंगामध्ये न्हाऊया
झुकूनी आभाळ खाली
धरणीस ही साद घाली
झुकूनी आभाळ खाली
धरणीस ही साद घाली
पाकळी फुले भुंग्याचा पिंगा
आभाळी चाले किरणांचा दंगा
पानांच्या वरी थेंब दाटते
ओठ ऊन्हाचे टिपून घेती
भाषा ही समजून घेऊया
प्रेमाच्या तालामध्ये नाचूया
संकोच भीड दूर सारुया
बेबंद आनंदात खेळूया
या नाचूया गाऊया
बंधन सारे तोडूया
या हर्षाच्या जोशाच्या
रंगामध्ये न्हाऊया
झुकूनी आभाळ खाली
धरणीस ही साद घाली
झुकूनी आभाळ खाली
धरणीस ही साद घाली
वेलींच्या गोपी
झाडांचा कान्हा
घालीती मिठी एकमेकांना
रंगात येई रास प्रीतीचा
अंगात भीने सूर वेळूचा
जोडी जोडीने रास खेळूया
गोडी गोडीने गोफ गुंफूया
सोबत एकमेकां देऊया
आंनद जीवनाचा घेऊया
या नाचूया गाऊया
बंधन सारे तोडूया
या हर्षाच्या जोशाच्या
रंगामध्ये न्हाऊया
या नाचूया गाऊया
बंधन सारे तोडूया
या हर्षाच्या जोशाच्या
रंगामध्ये न्हाऊया
झुकूनी आभाळ खाली
धरणीस ही साद घाली
झुकूनी आभाळ खाली
धरणीस ही साद घाली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*